# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्प्लेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ 1235 /२०२०

दिनांक : ०३/०३/२०२०

## अधिसुचना

प्रति,

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील
मा. प्राचार्य तथा सर्व विभाग प्रमुख

**विषय : शेतकऱ्यांच्या पाल्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ : १) दिनांक १५/११/२०१९ रोजी झालेल्या मा. अधिसभेतील औचित्याचा प्रश्न.**

**२) मा. अधिसभा सदस्य यांची व्दि-सदस्यीय गठीत समितीचा अहवाल दि. २६/११/२०१९.**

**३) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांच्या गठीत समितीने दिलेला अहवाल.**

**४) मा. व्यवस्थापन परिषदेच्या नियमीत सभेतील झालेला निर्णय दि. १९/०२/२०२०**

उपरोक्त विषयान्वये विद्यापीठ परिक्षेत्रातील चंद्रपूर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयात पडलेल्या ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले आहे त्यामूळे नुकसानीच्या संदर्भात गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या परीक्षा शुल्क माफीसंदर्भात दिनांक १५/११/२०१९ रोजी झालेल्या अधिसभेमध्ये औचित्याच्या प्रश्नाला उत्तर देतांना मा. कुलगुरु महोदय यांनी शुल्क माफ करण्याबाबत घोषणा केलेली होती. त्या अनुषंगाने संदर्भ क्रं. १ अन्वये अधिसभेतील व्दि-सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीच्या अहवालातील शिफारशीनूसार संदर्भ क्रं. ०२ अन्वये अटी, शर्ती आणि परीक्षा शुल्क माफीसंदर्भात प्रक्रिया राबविल्या जाण्याकरिता तसेच अंतिम निर्णय घेवून व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्याकरिता मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि वित्त व लेखा अधिकारी यांची समिती गठीत करुन पुढील दिशा ठरविण्याकरिता निर्देशीत करण्यात आलेले होते. सदर समितीच्या अहवालास दिनांक १९/०२/२०२० रोजी मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून संलग्नित केलेल्या परीक्षा शुल्क माफीसंदर्भात अटी व शर्तीच्या अधिन राहून 'उन्हाळी २०२०' व 'हिवाळी २०२०' या दोन परीक्षेतील संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. करिता संबंधितांनी यासंदर्भात कार्यवाही घेवून विद्यापीठाकडे तसा अहवाल सादर करावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने

3/3/2020

(डॉ.अनिल झेड.चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती करिता सादर.
२. मा. प्र. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती करिता सादर.
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती करिता सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती करिता सादर.
५. उपकुलसचिव, परीक्षा पुर्व/उपरांत विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती करिता सादर.

# शेतकऱ्यांच्या पाल्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतची नियमावली

१. विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयात शिकणाऱ्या व या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारे विद्यार्थी शेतकऱ्यांचे पाल्य असावे व विहीत केलेल्या अर्जासहित सांक्षाकिंत केलेला ७/१२ जोडणे अनिवार्य राहील.

२. शेतमजूरांच्या पाल्यांना सुध्दा ही योजना लागू राहील मात्र सदर विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत सचिवांचा दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

३. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक शासकिय, निमशासकीय व स्वायत्त संस्थेमध्ये नोकरीवर नसावेत.

४. जे विद्यार्थी महाराष्ट्र शासनाकडून शिष्यवृत्ती धारक व इतर शुल्क माफीच्या योजनेसाठी पात्र आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागु असणार नाही.

५. सदर योजनेचा लाभ 'उन्हाळी २०२०' व 'हिवाळी २०२०' या परीक्षेकरिता देण्यात येईल.

६. विहीत नमुन्यामध्येच विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केलेला असावा व त्या अर्जास प्राचार्यांनी प्रमाणित केलेले असावे.

3/3/2020

(डॉ.अनिल झेड.चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# अर्जाचा नमुना

विद्यार्थ्यांनी फोटो येथे लावावे.

विद्यार्थ्यांचे नांव : ..........................................................................

संपुर्ण पत्ता : ...................................................................................

महाविद्यालयाचे नांव : ..........................................................................

अभ्यासक्रम : ........................................ वर्ष ..............................

सेमीस्टर : ..........................................................................................

शासनाकडुन शिष्यवृत्ती/परीक्षा शुल्क माफ योजनेचा लाभ मिळतो का ?

होय/नाही : ........................................................................................

पालक शासकिय/निमशासकीय/स्वायत्त संस्थेत नोकरीवर आहेत काय ? होय/नाही

**हमीपत्र : –**

मी ........................................................ शपथपुर्वक घोषित करतो/करते की, वरील संपूर्ण माहिती परीपुर्ण सत्य आहे. असत्य आढळल्यास मी भा.द.वि.चे १८६० अन्वये कलम १९९, २००, १९३ ३ (२) चे अन्वये संबंधित कायद्यानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनीयम २०१६ नुसार शिक्षेस व दंडास पात्र राहील.

दिनांक :

ठिकाण :

**विद्यार्थ्यांची स्वाक्षरी**

**प्राचार्यांची शिफारस :–**

वरील सर्व माहिती महाविद्यालयाकडे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे तपासली असुन बरोबर आहे. त्यामुळे विद्यापीठाकडुन मिळणाऱ्या परीक्षा शुल्क माफीस सदर विद्यार्थी पात्र आहे. सबब परीक्षा शुल्क माफीची शिफारस करीत आहो.

**प्राचार्यांची स्वाक्षरी/शिक्का**

**अटी व शर्ती :–**

१. अर्जासोबत शेतकऱ्यांचा पाल्य असल्याबाबतचा पुरावा जोडावा (७/१२ प्रत, गांव नमुना ०८ अ सांक्षाकिंत प्रत जोडणे अनिवार्य)
२. शेतमजुर असल्यास ग्रामपंचायत सचिवांचा दाखला जोडावा.